# eProcurement System Government of Maharashtra

## Tender Details

Date : 02-Aug-2024 03:19 PM

Print

### Basic Details

| | | | |
|---|---|---|---|
| **Organisation Chain** | Director of Technical Education Department Mumbai\|\|Joint Director of Technical Education Pune\|\|Govt. College of Engineering and Research Awasari | | |
| **Tender Reference Number** | GCOEARA/CONTRACT SERVICE/2024/2181 | | |
| **Tender ID** | 2024_DTEDM_1051401_1 | **Withdrawal Allowed** | Yes |
| **Tender Type** | Open Tender | **Form of contract** | Lump-sum |
| **Tender Category** | Services | **No. of Covers** | 2 |
| **General Technical Evaluation Allowed** | No | **ItemWise Technical Evaluation Allowed** | No |
| **Payment Mode** | Online | **Is Multi Currency Allowed For BOQ** | No |
| **Is Multi Currency Allowed For Fee** | No | **Allow Two Stage Bidding** | No |

### Payment Instruments

**Online Bankers**

| S.No | Bank Name |
|---|---|
| 1 | SBI Bank |

### Cover Details, No. Of Covers - 2

| Cover No | Cover | Document Type | Description |
|---|---|---|---|
| 1 | Fee/PreQual/Technical | .pdf | Tender Document - Housekeeping |
| 2 | Finance | .xls | Tender Document BOQ (Financial) - Housekeeping |

### Tender Fee Details, [Total Fee in ₹ * - 5,400]

| | | | |
|---|---|---|---|
| **Tender Fee in ₹** | 5,400 | | |
| **Fee Payable To** | Nil | **Fee Payable At** | Nil |
| **Tender Fee Exemption Allowed** | No | | |

### EMD Fee Details

| | | | |
|---|---|---|---|
| **EMD Amount in ₹** | 90,000 | **EMD Exemption Allowed** | No |
| **EMD Fee Type** | fixed | **EMD Percentage** | NA |
| **EMD Payable To** | Nil | **EMD Payable At** | Nil |

Click to view modification history

### Work /Item(s)

| | |
|---|---|
| **Title** | Contractual Services- Housekeeping and Gardening |
| **Work Description** | Contractual Services- Housekeeping and Gardening of institutional area, indoor, outdoor cleaning, gardening |
| **Pre Qualification Details** | Please refer Tender documents. |
| **Independent External Monitor/Remarks** | NA |
| **Tender Stage to disclose bid details to other bidders/public domain** | Yes |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **Tender Value in ₹** | 32,00,000 | **Product Category** | Housekeeping/ Cleaning | **Sub category** | NA |
| **Contract Type** | Tender | **Bid Validity(Days)** | 180 | **Period Of Work (Days)** | 14 |
| **Location** | GCOEARA, Avasari Khurd, Ambegaon, Pune, MH | **Pincode** | 412405 | **Pre Bid Meeting Place** | GCOEARA, Avasari Khurd, Ambegaon, Pune, MH |
| **Pre Bid Meeting Address** | Conference Hall, Admin Building, GCOEARA, Avasari Khurd, Ambegaon, Pune, MH | **Pre Bid Meeting Date** | 09-Aug-2024 11:00 AM | **Bid Opening Place** | GCOEARA, Avasari Khurd, Ambegaon, Pune, MH |
| **Should Allow NDA Tender** | No | **Allow Preferential Bidder** | No | | |

## Critical Dates

| | | | |
|---|---|---|---|
| **Publish Date** | 02-Aug-2024 03:25 PM | **Bid Opening Date** | 20-Aug-2024 05:00 PM |
| **Document Download / Sale Start Date** | 02-Aug-2024 03:25 PM | **Document Download / Sale End Date** | 19-Aug-2024 05:00 PM |
| **Clarification Start Date** | 02-Aug-2024 03:25 PM | **Clarification End Date** | 19-Aug-2024 05:00 PM |
| **Bid Submission Start Date** | 02-Aug-2024 03:25 PM | **Bid Submission End Date** | 19-Aug-2024 05:00 PM |

## Tender Documents

**NIT Document**

| S.No | Document Name | Description | Document Size (in KB) |
|---|---|---|---|
| 1 | Tendernotice_1.pdf | Tender Document- Housekeeping | 4674.45 |

**Work Item Documents**

| S.No | Document Type | Document Name | Description | Document Size (in KB) |
|---|---|---|---|---|
| 1 | Tender Documents | ETENDERHOUSEKEEPING.pdf | Tender Document- Housekeeping | 4657.56 |
| 2 | BOQ | BOQ_1835773.xls | Tender BOQ (Financial) - Housekeeping | 286.00 |

## Bid Openers List

| S.No | Bid Opener Login Id | Bid Opener Name | Certificate Name |
|---|---|---|---|
| 1. | nsnehe@gmail.com | Navnath Nehe | NAVNATH SOPANRAO NEHE |
| 2. | principal@gcoeara.ac.in | Dilip Pangavhane | DILIP RAMBHAU PANGAVHANE |
| 3. | sharadkshirsagar@gmail.com | Sharad Kshirsagar | SHARAD VITTHAL KSHIRSAGAR |

## Tender Properties

| | | | |
|---|---|---|---|
| **Auto Tendering Process allowed** | No | **Show Technical bid status** | Yes |
| **Show Finance bid status** | Yes | **Show Bid Details in Public Domain stage** | Technical Bid Opening |
| **BoQ Comparative Chart model** | Normal | **BoQ Compartive chart decimal places** | 3 |
| **BoQ Comparative Chart Rank Type** | L | **Form Based BoQ** | No |

## Tender Inviting Authority

| | |
|---|---|
| **Name** | Princiapl |
| **Address** | GCOEARA, Avasari Khurd, Ambegaon, Pune, MH |

| **Tender Creator Details** | |
|---|---|
| **Created By** | Sharad Kshirsagar |
| **Designation** | Associate Professor |
| **Created Date** | 11-Jul-2024 03:17 PM |

# शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,

**अवसरी (खुर्द), ता. आंबेगाव, जि. पुणे ४१२ ४०५**

**दुरध्वनी क्रं. (०२१३३) २३०५८१ फॅक्स (०२१३३) २३०५८३**

**ईमेल : gcoeara@gmail.com वेबसाईट : www.gcoeara.ac.in**


जा.क्र.शाअवसंमअ/कंत्राटी सेवा/२०२४/ 2181 दिनांक: 02 AUG 2024

**परिपत्रक**

**ई- निविदा (सफाईगार व माळी कामगार)**

शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविदयालय, अवसरी खुर्द ता. आंबेगाव जि. पुणे या संस्थेसाठी सफाईकामगार व माळी कामगार मनुष्यबळ पुरविण्यासाठी मनुष्यबळ सेवा कंत्राटदाराकडुन दोन लिफाफा पध्दतीने ई निविदा मागविण्यात येत आहे. ई- निविदा भरण्याची पध्दत महाराष्ट्र शासनाचे संकेत स्थळ https://mahatenders.gov.in या ई-निविदा संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सदर ई-निविदा संबंधित कागदपत्रे वरील नमुद केलेल्या संकेतस्थळावर उपलब्ध होत आहेत ती इच्छुक कंत्राटदारांनी वरील संकेत स्थळावरुन घ्यावी. सदरच्या निविदेसाठी इ-निविदा शुल्क रु.५४००/- नापरतावा ऑन लाईन पध्दतीने ई-निविदा संकेत स्थळावर अदा करणे आवश्यक आहे.

निविदाकारास निविदा सादर करण्यासाठी काही शंका असल्यास त्याचे निराकरण निविदापुर्व बैठकीत करण्यात येईल. निविदा सादर करण्याची अंतिम तारीख १९/०८/२०२४

**ई-निविदा संबंधि महत्वाची माहिती**

| अ.क्र. | विवरण | माहिती |
|---|---|---|
| १ | ई-निविदा | https://mahatenders.gov.in या ई-निविदा संकेतस्थळावर उपलब्ध आहे. |
| २ | कामाचे स्वरुप | शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविदयालय, अवसरी खुर्द ता. आंबेगाव जि. पुणे या संस्थेसाठी सफाईकामगार व माळी कामगार मनुष्यबळ सेवा पुरवठा ११ महिन्यासाठी करणे. |
| ३ | ई-निविदा शुल्क | रु.५४००/- ना परतावा ऑन लाईन पध्दतीने ई-निविदा संकेतस्थळावर अदा करणे आवश्यक आहे. |
| ४ | बयाणा रक्कम | रु.९००००/- प्रक्रिया पुर्ण झाल्यावर मिळेल. |
| ५ | संपर्कासाठी पत्ता | शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविदयालय, अवसरी खुर्द ता. आंबेगाव जि. पुणे ४१२४०५. |
| ६ | दूरध्वनी क्रमांक | ०२१३३-२३०५६८ (कार्यालय अधिक्षक) |
| ७ | ईमेल आय.डी. | principal.gcoeara@dtemaharashtra.gov.in |
| ८ | ई-निविदा संकेतस्थळ | https://mahatenders.gov.in |
| ९ | ई-निविदा वैधता | ९० दिवसांकरिता |

निविदाकारांनी निविदेसोबत आवश्यक ती सर्व कागदपत्रे जोडावी. आवश्यक ती कागदपत्रे जोडलेली नसल्यास निविदा रद्द समजण्यात येईल. कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा रद्द करण्याचा हक्क राखून ठेवण्यात येत आहे.

02-8-24

(डॉ. डी. आर. पानगव्हाणे)
प्र. प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,
अवसरी (खुर्द), ता. आंबेगाव, जि. पुणे.

शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय अवसरी (खुर्द), ता.आंबेगाव, जि.पुणे

निविदा पत्रक मुल्य रु.५४००/-

## निविदा पत्रक

### सफाईगार व माळी कामगार मनुष्यबळ सेवा कंत्राटी पध्दतीने पुरविण्यासंबंधी अटी व शर्ती

**शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविदयालय, अवसरी खुर्द ता. आंबेगाव जि. पुणे या संस्थेसाठी सफाईकागमार व माळी कामगार मनुष्यबळ पुरविण्यासाठी मनुष्यबळ सेवा कंत्राटदारंकडुन दोन (तांत्रिक व वाणिज्यीक) लिफाफा पध्दतीने ई-निविदा मागविण्यात येत आहे.**

### कराराच्या अटी व शर्ती

१) **कराराचा कालावधी -** कराराचा कालावधी ११ महीने राहील. सदर कालावधीत कंत्राटी पध्दतीने कामगार नेमणुकीबाबत शासनाचे काही वेगळे धोरण ठरल्यास करार तात्काळ संपुष्टात आणण्याचे अधिकार संस्थेच्या प्राचार्यांना राहतील. ११ महिन्यातील कामाचा दर्जा समाधनकारक असल्यास करार आणखी ११ महिन्यासाठी वाढविण्याचे अधिकार संस्थेच्या प्राचार्यांना राहतील. सेवा पुरवठादारांना करार संपुष्टात आणावयाचा असल्यास त्यांनी संस्थेला तीन महिन्याची पूर्व सूचना देणे आवश्यक राहील.

२) **कामाची वेळ -** सकाळी ९:०० ते सायंकाळी ५:०० पर्यंत (भोजन विश्राम दु. १-३० ते दु. २-००) (कामगार कायदयाप्रमाणे देय असलेल्या सुटटया सोडुन इतर सर्व दिवस) आवश्यक भासल्यास कामाच्या वेळेत बदल करण्याचे अधिकार संस्थेच्या प्राचार्यांना राहतील.

३) **कामाची व्याप्ती व स्वरुप:-**
संस्थेचे कामकाज नियमितपणे चालू असतांना १२ सफाईकामगार व ४ माळी कामगार पुरविणे आवश्यक राहील. मुलींच्या वसतीगृहातील साफसफाई कामासाठी सफाईगार कर्मचा-यांपैकी किमान ४ कर्मचारी महिला असणे आवश्यक आहे. तथापी वेळोवेळी संस्थेच्या आवश्यकतेनुसार सफाईकामगार व माळी कामगारांची संख्या कमी / जास्त करण्याचे अधिकार संस्थेच्या प्राचार्यांना राहतील. त्यामुळे वाणिज्यिक निविदा सादर करतांना दरमहा एका कामगाराचे अपेक्षित वेतन नमूद करावे. त्या दराने सर्व कामगारांचे एकत्रित वेतन परिगणित करुन अदा केले जाईल.

**अ) सफाईगार - खालील नमूद दैनंदिन कामे करणे (साफसफाईसाठी आवश्यक साहीत्य संस्थेकडुन पुरविले जाईल)**

१. संस्थेची मुख्य प्रशासकीय व ग्रंथालय इमारत, कर्मशाळा इमारत, शैक्षणिक विभागाच्या इमारती, नियमित मुलांचे वसतीगृह इमारती, मुलींच्या वसतीगृह इमारती व पर्यायी वसतीगृहे इमारतीमधील प्रसाधनगृहे (Wash rooms and toilets) फिनेल /ॲसिड टाकुन स्वच्छ करणे, मोकळे व्हरांडे जिने, महाविदयालय परिसर, इमारतींच्या बाहेरील परिसराची झाडलोट व साफसफाई करणे.
२. कवयित्री शांता शेळके सभागृह याची स्वच्छता करणे.
३. सर्व प्रसाधनगृहे (Wash rooms and toilets) स्वच्छ राखणे अत्यावश्यक राहील. कोणत्याही परिस्थितीत प्रसाधनगृहात दुर्गंधी येता कामा नये.
४. संस्थेच्या संपूर्ण आवारातील पादचारी पथ, मुख्य रस्ते यांची झाडलोट करणे.
५. संस्थेच्या इमारतीमधील Water coolers स्वच्छता करणे.
६. संपूर्ण संस्था परिसर कचरा व प्लॅस्टीकमुक्त ठेवणे, जमा झालेला ओला व सुका कचरा वेगळा करुन त्याची योग्य विल्हेवाट लावणे.
७. इमारतीमधील कोळीष्टके/जळमटे काढणे.
८. संस्था परिसरात कोठेही पाण्याची नासाडी अथवा गळती होत असल्यास वरिष्ठाना त्वरीत सूचित करणे.
९. प्राचार्यांचे अथवा संस्था स्तरावरील नियंत्रण अधिकारी यांचे सूचनेनुसार वेळोवेळी आवश्यकतेनुसार नेमून दिलेली इतर कामे करणे.

**ब) माळी कामगार -खालील नमूद दैनंदिन कामे करणे (साफसफाईसाठी आवश्यक साहीत्य संस्थेकडुन पुरविले जाईल)**

१. संस्थेच्या परिसरातील बगीचाची देखभाल करणे.
२. संस्था परिसरातील गवत वेळोवेळी काढणे, झाडांच्या अनावश्यक फांदया छाटणे.
३. बगीचा व झाडांना ठिंबक सिंचनाव्दारे पाणी देण्याची जी व्यवस्था केली आहे. त्याची देखभाल करुन सर्व झांडांना पाणी देणे. ठिबक सिंचन बंद असल्यास अन्य मार्गाने पाणी देणे.
४. संस्था परिसरात नवीन वृक्षारोपण करणे.

शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय अवसरी (खुर्द), ता.आंबेगाव, जि.पुणे. सत्यमेव जयते

५. प्राचार्यांचे अथवा संस्था स्तरावरील नियंत्रण अधिकारी यांच्या सूचनेनुसार वेळोवेळी आवश्यकतेनुसार नेमून दिलेली इतर कामे करणे.

४) सेवा पुरवठादारास राज्य / केंद्र शासनाच्या कामगार कायदा आणि तत्सम इतर कायदयांच्या अनुषंगाने लागू असलेल्या सर्व कायदेशीर तरतुदीचे पालन करणे बंधनकारक असेल. कामगारांना किमान कायदयातील वेतन कायदयातील तरतूदीपेक्षा कमी वेतन अदा केल्याचे निदर्शनास आल्यास कंत्राट तात्काळ रद्द करण्यात येईल व सेवा पुरवठादाराचे नाव काळया यादीत टाकण्यात येईल. तसेच कायदा उल्लंघनासंदर्भातील कायदेशीर कार्यवाहीस सेवा पुरवठादार जबाबदार राहील.

५) निवड झालेल्या सेवा पुरवठादार संस्थेव्दारे काम करणा-या मनुष्यबळास, त्या पुरवठादार संस्थेने ओळखपत्र व गणवेश देणे आवश्यक राहील.

६) सर्व सफाई काम व बागकामाचे नियोजन व देखरेख करण्यासाठी सेवा पुरवठादाराने त्याचे स्तरावरुन एक पर्यवेक्षक नेमून देणे आवश्यक राहील, त्याचे वेगळे वेतन शासकीय संस्थाकडुन अदा केले जाणार नाही.

७) निवड झालेल्या सेवा पुरवठादारास संस्थेव्दारे काम करणा-या मनुष्यबळाकडुन संस्थेच्या परिसरात कोणत्याही प्रकारचे धूम्रपान, मदयपान आणि कोणत्याही स्वरुपाचे गैरवर्तन अथवा चोरी / हानी होणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी सेवा पुरवठादार याची राहील. गैरवर्तण करणा-या कामगाराच्या बदल्यात प्राचार्यांच्या सूचनेनुसार दुसरा कामगार उपलब्ध करुन देण्याची जबाबदारीसेवा पुरवठादारची राहील.

८) सेवा पुरवठादार संस्थेव्दारे काम करण्या-या मनुष्यबळास काम करीत असतांना काही अपघात इत्यादी झाल्यास त्यास संस्था प्रशासन कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाही. त्यास आवश्यक ते वैदयकीय उपचार देण्याची जबाबदारी सेवा पुरवठादाराची राहील. कामगारांच्या निष्काळजीपणामुळे संस्थेच्या मालमत्तेचे कोणतेही नुकसान झाल्यास त्याची भरपाई देण्याची जबाबदारी सेवा पुरवठादाराची राहील.

९) सेवा पुरवठादाराने पुरविलेल्या मनुष्यबळाच्या देय असलेया सर्व रकमा नियमित पणे अदा करण्याची /त्याची खाती जमा करण्याची सर्व जबाबदारी सेवा पुरवठादार यांची राहील. कामगारांना त्यांची देय असलेली रक्कम देऊन कायदयाप्रमाणे इतर रकमांची कपात करुन त्या रकमा संबंधित प्राधिकरणाकडे जमा केल्याबाबत पृष्टयर्थ कागदपत्र वेळोवेळी संस्थेकडे सादर करावे लागतील.

१०) सेवा पुरवठादारामार्फत नियुक्त कामगारांचे वय, कामगार अधिनियमानुसार असणे तसेच नियुक्त कामगार शारिरिक दृष्टया सुद्दढ असणे आवश्यक राहील.

११) सेवा पुरवठादारामार्फत नियुक्त मनुष्यबळास नियमित शासकीय कर्मचा-यांना देय असलेल्या कोणत्याही सवलती अथवा आर्थिक फायदे देय राहणार नाही, तसेच त्यांना भविष्यात नियमित नियुक्तीचा हक्क सांगता येणार नाही.

१२) ज्या सेवा पुरवठादार यांची निविदा स्वीकृत होईल त्यांनी नोटरीसमोर रु.१००/- च्या स्टॅम्पपेपरवर सर्व अटी/शर्ती मान्य असल्याचा करारनामा सादर केल्यावर ११ महिन्यांचे कंत्राट अस्तित्वात येईल.

१३) काम सुरु केल्यावर लगेचच कामगारांना विमा काढणे बंधनकारक राहील.

१४) सेवा पुरवठादाराने ११ महिन्याचे करार संपण्यापूर्वी एक महिन्याची पूर्व सूचना न देता काम बंद केल्यास सुरक्षा ठेव रक्कम जप्त करुन शासनास जमा करण्यात येईल.

१५) कराराच्या कालावधीत सेवा पुरवठादारांनी पुरविलेल्या सेवा असमाधानकारक आढळल्यास करार संपुष्टात आणण्याचे अधिकार प्राचार्यांना राहतील.

१६) प्रत्येक महिन्याचे देयके वेगवेगळे सादर करावे लागेल व त्या देयकाची रक्कम शासकीय कोषागारातून पारित झाल्यावर अदा केली जाईल. सदरची रक्कम सेवा पुरवठादारांच्या बॅक खात्यात जमा केली जाईल. कोणत्याही परिस्थितीत परस्पर कामगारांना वेतन अदा केले जाणार नाही.

१७) देयक पारित करणे हे शासनाकडुन उपलब्ध अनुदानावर अवलंबून राहील. देयकापोटी कोणतीही अग्रिम रक्कम अदा केली जाणार नाही. शासनाकडुन अग्रिम मिळाले नाही या कारणासाठी देयक प्रदानास विलंब झाल्यास कोणतेही व्याज देय राहणार नाही. मासिक देयकामध्ये सेवा कर, आयकर, विमा व इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करणे सेवा पुरवठादारास आवश्यक राहील.

१८) सेवा पुरवठादाराने पुरविलेल्या मनुष्यबळाची COVID-19 च्या अनुषंगाने अथवा अन्य कोणत्याही संगर्गजन्य रोगाच्या अनुषंगाने वेळोवेळी वैदयकीय तपासणी करणे, त्यांचे लसीकरण झाले असल्याची खात्री करणे, त्यांनी शासनाच्या COVID-19 बाबत अथवा इतर संसर्गजन्य रोग प्रतिबंक सूचनांचे तंतोतंत पालन करणे याची संपूर्ण जबाबदारी सेवा पुरवठादाराची राहील.

१९) कोवीड-१९ अथवा इतर संसर्गजन्य रोगराई सदृश (आपत्तीजनक) परिस्थिती उदधवल्यास, त्या कालावधीमध्ये, पुरवठादाराने पुर्ण क्षमतेने मनुष्यबळ पुरविणे बंधनकारक राहील व सेवा पुरवठादाराने कमाचा पोटठेका (sub contract) अन्य कंत्राटदारास दिल्याचे आढळून आल्यास

शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय अवसरी (खुर्द), ता.आंबेगाव, जि.पुणे. सत्यमेव जयते

करार तात्काळ रद्द करण्यात येईल.

२०) सेवा पुरवठादाराने नेमलेल्या कामगारांचे हजेरी पत्रक कामाच्या ठिकाणी ठेवणे व त्यावर दररोजची हजेरी कामाच्या सुरुवातीसच मांडणे आवश्यक राहील. संस्थेच्या प्राचार्यांना ते हजेरी पत्रक तपासण्याचा अधिकार राहील व तपासणीमध्ये कामगार कामावर न आढळल्यास त्याची गैरहजेरी धरण्यात येईल.

२१) सेवा पुरवठादाराने पुरविलेल्या मनुष्यबळास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक राहील. त्यांना मराठी भाषेत देण्यात येणा-या लेखी अथवा तोडी सूचना समजणे आवश्यक आहे.

## निविदाकाराच्या पात्रतेचे निकष

१) निविदाकार महाराष्ट्र शासनाच्या रोजगार व स्वयंरोजगार विभाग किंवा राज्य/केंद्र शासनाच्या सेवा पुरवठादाराच्या नोंदणीसाठी प्राधिकृत संस्थांकडे नोंदणीकृत असावा. सदर नोंदणी प्रमाणपत्र निविदा भरण्याच्या शेवटच्या दिनांकानंतर कमीत कमी एक महिन्यापर्यंत वैध असावे.

२) वैध Shop Act नोदणी प्रमाणपत्र उपलब्ध असणे आवश्यक आहे. त्या नोंदणीत धंदयाचे स्वरुप हे "Housekeeping and Labour Contractor" अथवा "Housekeeping Contractor" असे अथवा "Labour Contractor" तत्सम असणे आवश्यक आहे.

३) निविदाकार यांना यापूर्वी राज्य शासन / केंद्र शासन यांची कोणतीही आस्थापना अथवा त्यांची अंगीकृत मंडळे यांना मनुष्यबळ सेवा समाधानकारकरित्या पुरविण्याचा दि.०१-०७-२०१८ नंतरच्या कालावधीचा कमीत कमी तीन वर्ष अनुभव असणे आवश्यक आहे.

४) नोंदणीकृत आस्थापनेस अनुसरुन आवश्यक वैयक्तिक मालकाचे अथवा संस्थेचे PAN Card असावे.

५) सेवा पुरवठादाराकडे जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे, तसेच निविदा सादर करावयाच्या अंतिम दिनांकापूर्वी सहा महिने आधीचे जीएसटी भरणा केल्याचे चलन उपलब्ध असणे आवश्यक आहे.

६) वैध ईपीएफ नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

७) व्यवसाय कर नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

८) मागील दोन वर्षाचे (आर्थिक वर्ष २०२१-२२ व २०२२-२३ Income Tax Return filing ackonowledgement) उपलब्ध असणे आवश्यक आहे.

९) निविदारकाराने निविदा शुल्क रु.५४००/-(नापरतावा) ऑन लाईन पध्दतीने ई-निविदा संकेत स्थळावर अदा केलेले असणे आवश्यक आहे.

१०) निविदा बयाणा रक्कम रु.९००००/-ऑन लाईन पध्दतीने अदा केले असणे आवश्यक आहे.

११) यापूर्वी कोणत्याही शासकीय / निम शासकीय आस्थापनेव्दार दंडात्मक कार्यवाही (काळया यादीत नाव टाकणे) केली नसल्याबाबत हमीपत्र सादर करावे.

## निविदा सादर करावयाची पध्दत

१) प्रत्येक निविदाकारास एकच निविदा भरता येईल.

२) निविदा भरण्यापूर्वी निविदाकाराने शक्यतो स्वत: पत्यक्ष संस्थेस भेट देऊन अथवा स्वत: प्रत्यक्ष भेट देणे शक्य नसल्यास किमान संस्थेचे संकेत स्थळ वर भेट देऊन संस्थेच्या इमारतींची व परिसराची माहिती करुन घ्यावी व नंतर निविदा भरावी असे आवाहन करण्यात येत आहे.

३) निविदा प्रसिध्द झाल्यांनतर ऑन लाईन / ऑफ लाईन पध्दतीने (त्यावेळेची परिस्थितीनुसार) Pre bid meeting आयोजित करण्यात येईल. त्यास निविदाकाराने अथवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधीने उपस्थित राहून शंका निरसरण करुन घ्यावे. या ऑन लाईन Pre bid meeting साठीचे लिंक संस्थेच्या संकेत स्थळावर दोन तास आधी उपलब्ध करण्यात येईल.

४) तांत्रिक निविदा - तांत्रिक निविदा ऑन लाईन पध्दतीने सादर करतांना (अपलोड करताना) खालील कागदपत्रांचा समावेश असेल :-

   १. पुरवठादाराने संस्थेच्य लेटरहेड वर सोबत दिलेले विवरण पत्र (प्रपत्र अ)
   २. पुरवठादाराने संस्था संबंधित सेवा पुरविण्यासाठी अधिकृत असल्याचे राज्य / केंद्र शासनाच्या आवश्यक विभागाचे नोंदणी प्रमाणपत्र.
   ३. वैध Shop Act नोंदणी प्रमाणपत्र (धंदयाचे स्वरुप हे "Housekeeping and Labour Contractor" अथवा "Housekeeping Contractor" अथवा "Labour Contractor" असे अथवा तत्सम)
   ४. संस्थेच्या संचालकांचे अथवा स्वत:चे नाव, कार्यालयीन पत्ता, संपर्क क्रमांक, ई मेल यांचे विवरणपत्र.
   ५. नोंदणीकृत आस्थापनेस अनुसरुन आवश्यक वैयक्तिक मालकांचे अथवा संस्थेचे PAN Card
   ६. जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र तसेच ३१/०३/२०२४ अखेरचे जीएसटी भरणा केल्याचे चलन.
   ७. वैध ईपीएफ नोंदणी प्रमाणपत्र.

शासकिय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय अवसरी (खुर्द), ता.आंबेगाव, जि.पुणे. सत्यमेव जयते

८. व्यवसायकर नोंदणी प्रमाणपत्र.
९. मागील दोन वर्षाचे (आर्थिक वर्ष २०२१-२२ व २०२२-२३) Income Tax Return filing acknowledgement
१०. यापूर्वी राज्य / केंद्र शासन अथवा यांची कोणतीही आस्थापना अथवा त्यांची अंगीकृत मंडळे यांना मनुष्यबळ सेवा समाधानकारकरित्या पुरविण्याचा दि-०१/०७/२०१८ नंतरच्या कालावधीचा किमान ३ वर्ष अनुभव असलेले प्रमाणपत्र.
११. निविदा शुल्क रु.५४००/- ऑन लाईन पध्दतीने अदा केल्याची पावती.
१२. बयाना रक्कम रु.९००००/- ऑन लाईन पध्दतीने अदा केल्याची पावती.
१३. यापूर्वी कोणत्याही शासकीय निमशासकीय आस्थापनाव्दारे दंडात्मक कार्यवाही (काळया यादीत नाव टाकणे, निष्कासन इत्यादी) केली नसल्याबाबत स्वसाक्षांकित हमीपत्र.

वरील सर्व कागदपत्रांची एकच pdf file करुन ती https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर अपलोड करण्यात यावी.

५) **वाणिज्यिक निविदा -** सोबत जोडलेल्या प्रपत्र ब नुसार वाणिज्यिक निविदेत एक सफाईगार/माळी कामगाराचे दरमहा अपेक्षित एकूण वेतन (करासहीत) सुस्पष्टरित्या नमूद करणे आवश्यक राहील.

## निविदा उघडण्याची कार्यपध्दती

१) नमूद करण्यात आलेल्या तारखेस ऑन लाईन निविदा उघडण्यात येतील व समितीव्दारे तांत्रिक छाननी करण्यात येईल.
२) तांत्रिक छाननी दरम्यान निविदाकाराने स्कॅन करुन अपलोड केलेले सर्व प्रमाणपत्र व वैधता तपासण्यात येईल.
३) पात्र निविदाकारांची यादी संस्थेच्या संकेत स्थळावर अपलोड करण्यात येईल.
४) तांत्रिक छाननीअंती पात्र असलेल्या निविदाकारांच्या वाणिज्यिक निविदा उघडण्यात येतील.
५) वाणिज्यिक निविदेत एका सफाईगार/माळी कामगाराचे दरमहा अपेक्षित एकूण वेतन (करांसहीत) सुस्पष्टरित्या नमूद केलेले नसल्यास निविदा फेटाळण्यात येईल.
६) दोन किंवा अधिक निविदाकारांच्या दरांमध्ये समानता असल्यास ज्या निविदाकारास राज्य शासन / केंद्र शासन अथवा यांची कोणतीही आस्थापना अथवा त्यांची अंगीकृत मंडळे यांना मनष्यबळ सेवा समाधानकारकरित्या पुरविण्याचा दि.०१-०७-२०१८ नंतरच्या कालावधीचा जास्त अनुभव असेल त्यास प्राधान्य देण्यात येईल.

शासकिय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द), ता.आंबेगाव, जि.पुणे.

# शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,

**अवसरी (खुर्द), ता. आंबेगाव, जि. पुणे ४१२ ४०५**

**दुरध्वनी क्रं. (०२१३३) २३०५८१ फॅक्स (०२१३३) २३०५८३**

**ईमेल : gcoeara@gmail.com वेबसाईट : www.gcoeara.ac.in**


जा.क्र.शाअवसंमअ/कंत्राटी सेवा/२०२४/ २१४१ दिनांक: 02 AUG 2024

**कार्यादेश देण्याची कार्यपध्दती**

१) ज्या निविदाकारांची निविदा स्वीकृत होईल त्यांनी नोटरीसमोर रु.१००/- च्या स्टॅम्पपेपरवर सर्व अटी /शर्ती मान्य असल्याचा करारनामा सादर केल्यावर ११ महिन्यांचे कंत्राट अस्तित्वात येईल.

२) वरील अनुक्रमांक १ ची पूर्तता केल्यानंतर कार्यादेश देण्यात येईल त्यानंतर ७ दिवसाच्या आत, ३ महिन्याच्या कालावधीच्या एकुण वेतन रक्कमेच्या १०% रक्कम सुरक्षा ठेव म्हणुन बॅक गॅरटी स्वरुपात जमा करावी लागेल.

३) सेवा पुरवठादाराने ११ महिन्यांचा करार संपण्यापूर्वी एक महिन्याची पूर्वसूचना न देता काम वंद केल्यास सुरक्षा ठेव रक्कम जप्त करुन शासनास जमा करण्यात येईल.

४) सदर निविदा प्रक्रिया वरिष्ठ कार्यालयाच्या मान्यतेच्या अधिन राहून राबविण्यात येत आहे.

उपरोक्त निविदेबाबत खालील वेळापत्रकानुसार कार्यवाही करण्यात येईल. त्यासाठी कोणताही वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही यांची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | कार्य विवरण | कालावधी |
|---|---|---|
| १ | ई-निविदा प्रदानाचा दिनांक | ०२-०८-२०२४ |
| २ | संस्थेच्या संकेतस्थळावर ई निविदा सूचना प्रसिध्द करणे | ०२-०८-२०२४ दुपारी ०२-३० वाजता |
| ३ | ई-निविदा सादर करण्याचा सुरुवातीचा दिनांक | ०२-०८-२०२४ दुपारी ०३-०० वाजता |
| ४ | ई-निविदा बैठक (Pre bid meeting) (इच्छुक निविदाकारांकरिता) | ०९-०८-२०२४ सकाळी ११-०० वाजता |
| ५ | ई-निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक | १९-०८-२०२४ सायंकाळी ०५-०० वाजता |
| ६ | निविदांची तांत्रिक छाननी | २०-०८-२०२४ दुपारी ०२-०० वाजता |
| ७ | तांत्रिक छाननीअंती पात्र निविदाकरांची यादी संस्थेच्या संकेत स्थळावर उपलोड करण्याचा दिनांक | २२-०८-२०२४ सायंकाळी ०४.०० वाजता |
| ८ | वाणिज्यिक निविदा उघडणे | २३-०८-२०२४ सकाळी ४.०० वाजता |

02-8-24

**(डॉ. डी. आर. पानगव्हाणे)**
**प्राचार्य,**
**शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,**
**अवसरी (खुर्द), ता. आंबेगाव, जि. पुणे.**

## प्रपत्र - अ (तांत्रिक निविदा)

**(संस्थेच्या लेटरहेडवर अथवा शिक्का असलेल्या को-या कागदावर)**

१) निविदाकाराच्या संस्थेचे नाव व संपूर्ण कार्यालयीन पत्ता

२) संस्था संबंधित सेवा पुरविण्यासाठी अधिकृत असल्याचे राज्य / केंद्र शासनाच्या आवश्यक विभागाचे नोंदणी प्रमाणपत्र अपलोड केले आहे काय ? - होय / नाही

३) वैध Shop Act नोंदणी प्रमाणपत्र (धंदयाचे स्वरुप हे "Housekeeping and Labour Contractor" अथवा "Housekeeping Contractor" अथवा "Labour Contractor" असे अथवा तत्सम) अपलोड केले आहे काय? होय / नाही

४) पुरवठादार संस्थेच्या संचालकांचे अथवा संस्थाचे नाव, कार्यालयीन पत्ता, संपर्क क्रामांक, ई मेल-

५) नोंदणीकृत आस्थापनेस अनुसरुन आवश्यक व्यैयक्तिक मालकांचे अथव संस्थेचे PAN Card अपलोड केले आहे काय ? होय / नाही

६) जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र तसेच ३१/०३/२०२४ अखेरचे जीएसटी भरणा केल्याचे चलन अपलोड केले आहे काय ? होय / नाही

७) वैध ईपीएफ नोंदणी प्रमाणपत्र अपलोड केले आहे काय ? होय / नाही

८) व्यवसाय कर नोंदणी प्रमाणपत्र अपलोड केले आहे काय ? होय / नाही

९) मागील दोन वर्षाचे (आर्थिक वर्ष २०२१-२२ व २०२२-२३) Income Tax Return filing acknowledgement अपलोड केले आहे काय ? होय / नाही

१०) यापूर्वी राज्य शासन / केंद्र शासन यांची कोणतीही आस्थापना अथवा त्यांची अंगीकृत मंडळे यांना मनुष्यबळ सेवा समाधानकारकरित्या पुरविण्याचा दि-०१/०७/२०१८ नंतरच्या कालावधीचा किमान ३ वर्ष अनुभव असलेले प्रमाणपत्र अपलोड केले आहे काय ? होय / नाही

११) निविदा शुल्क ५४००/- ऑन लाईन पध्दतीने अदा केल्याची पावती अपलोड केले आहे काय ? होय / नाही

१२) बयाना रक्कम रु.९००००/-ऑन लाईन पध्दतीने अदा केल्याची पावती अपलोड केले आहे काय? होय / नाही

१३) यापूर्वी कोणत्याही शासकीय निमशासकीय आस्थापनाव्दारे दंडात्मक कार्यवाही (काळया यादीत नाव टाकणे, निष्कासन इत्यादी) केली नसल्याबाबत स्वसाक्षांकित हमीपत्र अपलोड केले आहे काय ? होय / नाही

**मी / आम्ही खालील स्वाक्षरी करणार/करणारे असे शपथपूर्वक प्रमाणित करतो की वर नमूद करण्यात आलेली माहिती खरी असुन ती खोटी आढळल्यास होणा-या परिणामांची संपूर्ण जबाबदारी माझी/आमची राहील.**

**(स्वाक्षरी)**

**स्थळ :**

**(पुर्ण नाव व शिक्का)**

**दिनांक :**

## प्रपत्र - ब (वाणिज्यिक निविदा) (Proforma for the Commercial Technical Bid) (BoQ)

निविदाकाराने https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरिल सदर निविदेतील वाणिज्यिक निविदे मधील (Financial Bid) BoQ fill मध्ये Name of the Bidde/Bidding Firm/Company अचूक नमूद करावी व त्याच BoQ fill मध्ये मुद्दा क्र. ५.४ नुसार दर सर्व करांसहित अचूक भरावे.

Validate Print Help

**Item Rate BoQ**

**Tender Inviting Authority: Principal, Government College of Engineering and Research, Avasari Khurd**

**Name of Work: Suppy of human resource for Housekeeping and Gardening work**

**Contract No: GCOEARA/CONTRACTUAL SERVICE/2024/2181 Dated 02 August 2024**

| | |
|---|---|
| **Name of the Bidder/ Bidding Firm /** | |

**PRICE SCHEDULE**

**(This BOQ template must not be modified/replaced by the bidder and the same should be uploaded after filling the relevent columns, else the bidder is liable to be rejected for this tender. Bidders are allowed to enter the Bidder Name and Values only)**

| NUMBER # | TEXT # | NUMBER # | TEXT # | NUMBER | NUMBER # | NUMBER # | NUMBER # | TEXT # |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Sl. No. | Item Description | | | | BASIC RATE In Figures To be entered by the Bidder Rs. P | | | TOTAL AMOUNT In Words |
| 1 | 2 | 4 | 5 | 6 | 13 | 53 | 54 | 55 |
| 1 | Suppy of human resource for Housekeeping and Gardening work | | | | | | | |
| 1.01 | Expected Salary per person per month as per minimum wages act (inclusive of all taxes) | 1.000 | Nos | 1.00 | | 0.000 | 0.000 | INR Zero Only |
| Total in Figures | | | | | | 0.000 | 0.000 | INR Zero Only |
| Quoted Rate in Words | | INR Zero Only | | | | | | |